विविधा

# औषधी गुणधर्मांच्या कोरफडीची लागवड ठरते फायदेशीर



**नीलिमा गोबाडे**
(मो.नं. ९८२२३४७०५३)
उद्यानविद्या विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

**कोरफड** ही एक औषधी वनस्पती आहे. हिला संस्कृतमध्ये कुमारी आणि इंग्रजीत Aloevera म्हणतात. हिच्यापासून कुमारी आसव हे परंपरागत आयुर्वेदिक औषध बनते. लिलियासी कुळातील ही बारमाही उष्णदेशीय वनस्पती असून, हिचे उत्पत्तिस्थान वेस्ट इंडीज आहे. ही वनस्पती कॉस्मेटिक कंपन्या, औषधे इत्यादींमध्ये वापरली जाते. पाने जाड, मांसल असून पानांमध्ये पाणी गराच्या रूपात साठवलेले असते.

**हवामान** : कोरफड हे एक उबदार उष्णकटिबंधीय पीक असल्याने उष्ण व कोरडे हवामान अनुकूल असते. ही वनस्पती विविध प्रकारच्या वातावरणामध्ये जगू शकते. कमी पाऊस पडणाऱ्या क्षेत्रात तसेच उबदार दमट वातावरणामध्ये ही वनस्पती चांगल्या प्रकारे येऊ शकत असल्यामुळे, कमी पावसाच्या प्रदेशातही कोरफडीची लागवड करता येते.

**जमीन** : कोरफड ही विविध प्रकारच्या मातीमध्ये लावता येते. तथापि हलकी ते मध्यम, वालुकामय व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन या पिकास उत्तम असते. पाणी साठून राहणारी जमीन या पिकासाठी अत्यंत संवेदनशील आहे. चांगला निचरा केलेल्या काळ्या कसदार मातीमध्ये या पिकाची वाढ लवकर होते. जमिनीचा सामू ८.५ च्या वर असल्यास तसेच खारट जमिनीमध्ये या पिकाची लागवड करू नये.

**जाती** : एलो बार्बीडेन्सिस, पर्फोलियाटा, चिनेन्सिस, लिट्टोरालिस, इंडिका, अबायसिनिका, व्हल्गारसी, एएल-१, आयसी १११२६९, आयसी १११२७१, आयसी १११२८०.

**लागवड** : कोरफडीची अभिवृद्धी फुटवे- मुनव्यांपासून करतात. पावसाळा सुरू होताच म्हणजे जुलै- ऑगस्ट महिन्यामध्ये लागवड करावी. लागवडीसाठी जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी. एकरी ५ ते ८ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. जमिनीच्या मगदुरानुसार योग्य आकाराचे सपाट वाफे किंवा सरी-वरंबे तयार करावेत. लागवड करताना दोन ओळीत ६० किंवा ७५ सें.मी. व दोन झाडांमध्ये ४५ किंवा ६० सें.मी. अंतर ठेवावे. लागवड केलेल्या वाफ्यात किंवा वरंब्यावर पानांच्या वजनामुळे कोरफड कोलमडू नये म्हणून वेळोवेळी गरजेनुसार मातीचा आधार द्यावा. पिकाच्या वाढीच्या काळात एक-दोन खुरपण्या करुन वाफे तणरहित ठेवावेत. बुंध्याजवळील माती भुसभुसशीत ठेवल्याने वाढ चांगली होते.

**अन्नद्रव्ये व्यवस्थापन** : कोरफड ही औषधी वनस्पती असल्याने त्यात रासायनिक खतांचा वापर टाळून गांडूळ खत व निंबोळी खताचा वापर करावा. जमीन हलकी असल्यास, रासायनिक खते- प्रतिएकरी १५ किलो नत्र, १० किलो स्फुरद व १० किलो पालाश द्यावे.

**पाणी व्यवस्थापन** : जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या अवस्थेनुसार पिकास पाणी द्यावे. पावसाळ्यात व हिवाळ्यात कोरफडीस पाण्याची जास्त आवश्यकता नसते. याउलट उन्हाळ्यात १२ ते १५ दिवसांतून एकवेळ पाणी द्यावे लागते.

**कापणी व उत्पादन** : पानाचे टोक किंवा पानाचा रंग पिवळसर झाल्यानंतर, पूर्ण वाढ झालेल्या पानांची साधारणतः लागवडीनंतर १४ ते १६ महिन्यांनी कापणी करतात. वर्षाला सुमारे दोन कापण्या करतात. एक कापणी ऑगस्ट महिन्यामध्ये तर दुसरी कापणी जानेवारी महिन्यामध्ये केली जाते. सर्वसाधारणपणे एकरी ५ ते ८ टन ओली पाने मिळतात. काढणीपूर्वी झाडास पाणी दिल्यास पानातील पाण्याचे प्रमाण वाढते. कोरफडीची गुणवत्ता पानांच्या आकारावर व मांसलपणावर आधारित नसून, त्यामध्ये असलेल्या 'ॲलोईन' या औषधी तत्त्वावर अवलंबून असते. म्हणून कोरफड काढण्यापूर्वी एक महिना अगोदर पाणी तोडावे. मागणीनुसार कापणीच्या वेळेमध्ये बदल करतात. कापणी करताना मुख्य झाडाला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. कमी मेहनत व कमी खर्चात उत्पादन व उत्पन्न मिळत असल्याने इतर पिकांच्या तुलनेत कोरफड किफायतशीर ठरते. ■